## प्रकरण दुसरे

### माटे यांच्या व्यक्तित्वाच्या महत्त्वपूर्ण पैलूंचा कानोसा

## ::*:: प्रकरण दुसरे ::*::

### ** माटे यांच्या व्यक्तित्वाच्या जडणघडणीचा कालखंड **

माट्यांचा जन्म गरीब पण सुसंस्कृत कुटुंबात झाला. कुठल्याही प्रकारचे पाठबळ नसताना, केवळ स्वतःच्या उपजत बुध्दीच्या जोरावर त्यांनी आपल्या जीवनात प्रचंड यश मिळविले. एक सामान्य शिक्षक आपली शाळा सांभाळून बाहेरील जीवनात काय काय व्याप मांडू शकतो हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणांनी समाजाला दाखवून दिले.

टिळकांच्या राजकीय संघर्षाच्या उत्थानाच्या काळात माट्यांचे बालपण गेले. या प्रभावी काळाचा वारसा माट्यांनाही काही प्रमाणात मिळत गेला व त्यांचे व्यक्तिमत्त्व घडत गेले.

माट्यांचा बालपणाचा काळ हा शिंगणापूर, विटे सारख्या ग्रामीण भागात गेला. वडिलांच्या अकाली मृत्यूमुळे त्यांना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागले. पुढे मॅट्रिक होईपर्यंत ते साता-यास होते. ह्या सुमारास त्यांच्या कुटुंबाचे अतोनात हाल झाले. परंतु अशाही परिस्थितीत सगळ्या भावंडांनी आपले शिक्षण पूर्ण केले. माट्यांच्या आईची शिकवणच तशी होती. ती म्हणे, "ब्राह्मणाच्या मुलांनी हालविपत्तीने का होईना पण विद्या शिकलीच पाहिजे"[१] त्यांच्या आईने स्वतःच्या जीवाचे अत्यंत हाल करून घेऊन मुलांना जगविले शिकविले. आईच्या स्वभावातील ही कणखरवृत्ती माट्यांमध्येही ठासून भरलेली आढळते.

माट्यांवर झालेल्या आईच्या संस्काराच्या दृष्टीने त्यांच्या जीवनातील काही प्रतिकूल घटनांचा उल्लेख करावा लागेल. कारण याचाही परिणाम माट्यांच्या मनावर बराचसा झालेला आहे.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

माट्यांच्या आयुष्यातील प्रतिकूल घटना :

१८९७-९८ सालाच्या सुमारास गावात खूप मोठा दुष्काळ पडला होता. महागाई गगनाला भिडली होती अशा वेळी आपल्या मुलांना पुरेसे अन्न खायला मिळावे म्हणून माट्यांची आई एकवेळेसच जेवत असे. जवळजवळ पाच-सहा महिने त्यांनी असे काढले. माट्यांनी एकदा न राहवूनअसे कां ? म्हणून आईला विचारले, तेव्हा त्यांनी "चातुर्मासात मी एकवेळेसच जेवते" असे उत्तर दिले. माटे म्हणतात, "तिच्या या चातुर्मासाचा अर्थ माझ्या चित्तावर कोरला आहे. तिच्यापुढे नेहमी एकच विचार वागत असे, माझ्या पदरात ही पाच मुले घातली आहेत; आणि त्यांना तू मोठे कर" असे त्यांच्या वडिलांनी मला सांगितले आहे, अन ते मला करायचे आहे हे वाक्य आईने कितीदा तरी उच्चारले असेल."[२] ह्या प्रसंगातून माट्यांनी आईच्या स्वभावातील "सोशिकपणा" हा गुण उचलला.

पुढे १८९५ साली आलेल्या प्लेगच्या साथीमुळे त्यांचे असेच अतोनात हाल झाले. या प्लेगच्या साथीमुळे त्यांना दुस-यांच्या रानात र-हावे लागले होते. तिथे [शेतमालक] नानाच्या वाईटावर असलेल्या एका दुष्ट माणसाने शेतातील झोपड्यांना आग लावली. ह्या आगीमुळे अंगावरच्या कपड्याशिवाय त्यांच्याजवळ काही एक शिल्लक राहिले नाही. माटे या प्रसंगाबद्दल लिहितात, "आगीची वर्दी पांच मिनिटे जर उशीरा लागली असती, तर सगळ्याच माणसांचा होम झाला असता! त्या प्रसंगाचा भयानकपणा माझ्या मनावर कायमचा उमटलेला आहे."[3] हा प्रसंग माट्यांच्या आईने अत्यंत धीराने निभावून नेला.

यानंतर लगेच काही दिवसात ओला दुष्काळ पडला. यावेळी गावातील एका सधन कुटुंबातील रावजीबुवा गुळवणी नावाच्या गृहस्थाने माटे कुटुंबियांना मदत केली अत्यंत वाईट परिस्थितीत असताना सुध्दा माट्यांच्या आईने कोणाकडे मदतीची याचना केली नाही. माटे आईच्या स्वभावाबद्दल सांगतात, "बाईने कोणापुढे तोंड वेंगाडले नाही; की कोणाला दळू लागते; असे म्हणाली नाही थोडे असले तर थोडे द्यावे; मुळीच नसले तर मुळीच देऊ नये, आणि कोंड्याचा सुध्दा मांडा करून द्यावा अशी तिची त-हा असे."[४] हाच स्वाभिमान माट्यांमध्येही पुरेपूर उतरला होता याची प्रचीती आत्मचरित्र वाचताना येते.

पुढे वस्त्राच्या बाबतीत घरी कशी ओढाताण होत असे हे माट्यांनी सांगितले आहे. त्या काळी पोलिस शिपायाला "सवई" म्हणून एक तांबडी पगडी मिळत असे. ती चांगली पंधरावीस हात लांब आलवणाला पीळ देऊन केलेली असे. अशा प्रकारची पगडी दरसाल नवी मिळत असे. माट्यांचे वडील बंधू जरी पोलिसात होते तरी ते कारकुनी करीत असल्यामुळे ते ती पगडी वापरीत नसत. माट्यांच्या आईने या सवईचेच लुगडे करून नेसावयास सुरूवात केली हे पाहून सगळ्यांनाच खूप वाईट वाटले. कारण त्यावेळी त्यांच्याकडे अडीच तीन रूपये देखील साडी घेण्यासाठी नव्हते. असले तरी साडी घेणे परवडणारे नव्हते.

बालपणीच घरातील दारिद्र्यामुळे माट्यांवर एक वेगळाच संस्कार झाला होता. याचा उल्लेख त्यांनी एक प्रसंग सांगताना केला आहे. एकदा गावात विष्णुपंत छत्र्यांच्या सर्कशी बरोबर रहेमतखाँ गवईही आले होते. गावात त्यांचा जलशाचा कार्यक्रम होता. माटे-ही एका माणसाबरोबर कार्यक्रमाला चालले होते. पण त्यांना तिथे मोठमोठे प्रतिष्ठित श्रीमंत लोक जलशाला आलेले दिसले. त्यांना पाहून माटे तिथेच

बिचकून बाजूला जाऊन उभे राहिले व नंतर सोबतच्या माणसांनी आग्रह केल्यानंतरही ते जलशाला गेले नाहीत. केवळ त्यांच्या ह्या भित्र्या [बिभित्स] स्वभावामुळे गाणे ऐकण्याची उत्तम संधी मात्र त्यांनी घालविली. माटे आपल्या ह्या स्वभावाबद्दल म्हणतात,

"लहानपणापासूनच मोठया लोकांची मला भीती वाटत आली आहे तो दोष माझ्या स्वभावात अजूनही आहे. श्रीमंत माणसे, अधिकारी माणसे जमा झाली म्हणजे आपण यातले कोणी नव्हे, असे मला वाटू लागते, आणि मी तो प्रसंग तरी चुकवितो, किंवा गेलोच तर बाजूला जाऊन बसतो, हा दोष माझ्याठिकाणी लहानपणाच्या दारिद्र्यामुळे आला असावा."[5] पुढे म्हणतात, "दारिद्र्याचा मला मनापासून कंटाळा आला आहे आणि जगात कोणीही दरिद्री अथवा अनाथ राहता कामा नये असे मला मनापासून वाटते. दारिद्र्याने माणसाचे मन बहुतांशी मरते आणि स्वतःच्या संबंधाने हिनत्वाची कल्पना मनामध्ये येते."[6] सर्वसाधारण असा दोष पुष्कळांमध्ये आढळून येतो. दारिद्र्यामुळेच हा दोष माणसात येतो हे मत तितकेसे बरोबर वाटत नाही. कुठल्याही वर्गातील माणसांमध्ये हा दोष असू शकतो.

बालपणापासूनच दारिद्र्याचा अनुभव माट्यांना घ्यावा लागला यातूनच एक प्रकारचा न्यूनगंड ( Ilferiority Comples ) निर्माण झाला असावा. कारण मोठे लोक, श्रीमंत लोक आणि विद्वान व्यक्ती यांच्यामध्ये आपल्याला मिसळण्याचा संकोच वाटायचा असे त्यांनी नमूद केले आहे. या प्रकारचा संकोच किंवा भीती हा न्यूनत्वाच्या जाणिवेचाच एक प्रकार होय. दारिद्र्यामुळे एका बाजूला माट्यांचे मन आक्रसून जात होते, पण दुसऱ्या बाजूला मात्र लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे यांच्या लढाऊ बाण्याच्या, स्वातंत्र्यवादी

साहित्याचा परिणाम होऊन ते विकास पावत होते. टिळकांची सिंहगर्जना केसरीतून हजारो लोकांच्या कानी त्याकाळी पडत असे. "काळ" पत्रातले लेख जितके काव्यमय तितकेच स्फूर्ती देणारे असल्यामुळे त्या कालखंडात हजारो लोकांच्या मनावर त्याचा संस्कार होत होता. राजकारणात आणि समाजकारणात ध्येयनिष्ठ माणसांनी कर्तृत्व गाजविण्याचा तो काळ होता. अशा विशिष्ट कालखंडात माट्यांच्या ग्रहणशील मनाने जे जे टिपून घेतले ते ते पुढील आयुष्यात त्यांनी लिहिलेल्या वाङ्‌मयात आणि ते जगलेल्या जीवनात प्रकट झाले आहे. काळ आणि परिस्थिती व अनुभव हे संवेदनशील माणसाच्या मनाला घडवीत असतात. माट्यांचे बालपण आणि विद्यार्थीदशा या दोहोंवर तत्कालीन परिस्थितीच्या व काळाच्या अनेक स्पष्ट खुणा उमटलेल्या आहेत. हे जितके खरे तितकेच या कर्तृत्वाला स्फुरण देण्यासाठी ते कर्तृत्व प्रज्वलित करण्यासाठी काळ-परिस्थिती व वातावरण यांचाही उपयोग होतो. माट्यांचे व्यक्तिमत्व हे त्यांनी स्वत: जितके घडविले असेल तितकेच तत्कालीन परिस्थितीनेही त्याला विशिष्ट वळण दिले आहे यात शंका नाही.

आजूबाजूच्या परिस्थितीशी संघर्ष करीत शिकणा-या विद्यार्थ्यांच्या बुध्दीला एक प्रकारची तीव्र धार येत असते तशी ती माट्यांच्याही वृत्तीबुध्दीला यावी यात आश्चर्य नाही. त्यांच्या स्वाभिमानी, स्वतंत्र बुध्दीच्या स्पष्ट व प्रभावी अशा खुणा पुढे त्यांनी केलेल्या लेखनात आणि सामाजिक कार्यात दिसून येतात. त्याचे मूळ बालपणीच्या त्या विशिष्ट परिस्थितीबरोबर केलेल्या संघर्षात आहे असेही म्हणता येते.

## विद्यार्थी अवस्थेतील संस्कार :

माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी माटे सातारा-याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आले. या गावाने आणि येथील शाळेने माट्यांच्या मनावर काही दृढ अशा पाऊलखुणा उमटविल्या. सातान्यात त्या काळी काही बुध्दिमान, कर्तृत्वसंपन्न अशा व्यक्ती होत्या. उदा. दादासाहेब करंदीकर, दादासाहेब सोमण, भाऊराव पाटील इत्यादी. या व्यक्तींनी आपल्या गुणवत्तेचा ठसा समाज-जीवनावर उमटवला होता. विद्यार्थ्यांचा माध्यमिक शाळेतला कालखंड बहुधा त्याच्या व्यक्तित्वाला वळण द्यायला अधिक कारणीभूत होतो असे म्हणावे लागेल. एकतर माध्यमिक शाळेतल्या विद्यार्थ्यांचे मन प्राथमिक शाळेतल्या इतके कच्चे व अननुभवी राहिलेले नसते. वयानेही हा विद्यार्थी प्रौढ होण्याच्या मार्गावर असतो. आजूबाजूच्या परिस्थितीतून बरेवाईट संस्कार स्वीकारण्याची त्याची मानसिक तयारी या वयात होत असते. याशिवाय शाळेत शिकविणा-या शिक्षकांचा त्याच्यावर सर्वाधिक परिणाम होतो. आवडता शिक्षक त्याला आदर्श वाटतो. विभूतीपूजन करण्याची आणि अनुकरण करण्याची प्रवृत्ती यावेळी विशेष असते. माटे यांच्यावर अच्युतराव कोल्हटकर आणि सीतारामपंत देवधर यांच्या अध्यापनाचा व सानिध्याचा निश्चितच परिणाम झाला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. अच्युतरावांच्या अध्ययन पध्दतीबद्दलही आत्मचरित्रात माट्यांनी विस्तारपूर्वक लिहिले आहे. सीतारामपंत देवधर यांच्या त्यागी वृत्तीचा, शिकवण्याचा आणि त्यांच्या समाजसुधारणावादी विचारांचा परिणाम माट्यांवर अधिकांशाने झाल्याची कबुली आत्मचरित्रात त्यांनी दिली आहे.

सातारा हे त्याकाळी मोठे शहर नसेल पण मुंबई पुण्यातील सामाजिक राजकीय चळवळीचे पडसाद या शहरातही उठत होते. विशेषत: प्रार्थना समाजाची स्थापना सातान्यात झाली होती आणि त्यात विद्वान, व्यासंगी लोकांची प्रवचनेही होत असत. डॉ. भांडारकर यांचे प्रवचन जेव्हा माट्यांनी ऐकले तेव्हा त्यांच्यावर भांडारकरांच्या व्यक्तित्वाचा आणि विचारसरणीचा जो प्रभाव पडला त्याचे वर्णन त्यांनी आत्मकथनात केले आहे. भांडारकरांसारख्या विद्वानाच्या हाताखाली आपल्याला शिकण्याची संधी मिळाली असती तर उत्तम झाले असते, असे माट्यांनी म्हटले आहे. सारांश - न्यायमूर्ती रानडे, डॉ. भांडारकर, लो. टिळक, अच्युतराव कोल्हटकर, शिवरामपंत परांजपे अशा श्रेष्ठ व्यक्तींच्या पावलांचा मागोवा घेत माटे हळूहळू चालत होते. माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांचे मन अधिक स्वागतशील असते. चांगली शाळा, चांगले गुरु, आणि आदर्श प्रस्थापित करणारे लोकनेते माध्यमिक शाळेच्या वयातच माट्यांना काहीतरी मोलाचे संस्कार देऊन गेले. ही वाटचाल म्हणजे पुढील आयुष्यातल्या कर्तृत्वातली नांदी होती असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. माट्यांच्या आयुष्यातला हा काळ सुखाचा नसेल पण याच काळाने विचारवंत असे बापूसाहेब माटे घडवले यात अतिशयोक्ती नाही.

माटे यांचे वाचन :

विद्यार्थी अवस्थेतच माध्यमिक शाळेतच माटे यांच्यात हळूहळू एक लेखक घडू लागला असावा त्यांच्या विचाराला अंकुर फुटायला त्यांनी केलेले विविध आणि विस्तृत वाचन कारणीभूत झाले. एखादया लेखकाचे आणि विचारवंताचे व्यक्तिमत्त्व अनेक

कारणांनी घडत असते. विद्यार्थी अवस्थेपासून त्याच्या हातात कोणती पुस्तके पडतात यावर विचारांची वाढ होवू शकते. विद्यार्थ्याचे मन टिपकागदासारखे असते. शोषून घेण्याची त्याच्यात क्षमता असते. विद्यार्थी अवस्था मानसिक घडणीला सर्वात अधिक अनुकूल ठरते. यादृष्टीने विचार केल्यास माटे यांनी शाळा, कॉलेजात कोणकोणते कवी आणि ग्रंथकार वाचले होते याची माहिती घेणे उपयुक्त आहे. आपल्या आत्मचरित्रात याविषयी त्यांनी विस्ताराने लिहिलेच आहे.

लहानपणापासूनच आईला वाचून दाखवण्यासाठी जुन्या मराठी संत वाङ्मयाचे त्यांना वाचन करावे लागले. यात पंडित कवी श्रीधरांचे ग्रंथ, पांडवप्रताप हरिविजय, भक्ति-विजय, गुरुचरित्र आणि इतर पोथ्या पुराणे यांचेही प्रकट वाचन त्यांनी शेजा-यापाजारच्या स्त्रियांपुढे केल्याचा उल्लेख आहे. पुढे महाविद्यालयात विद्यार्थी असताना त्यांचा ह.भ.प.ल.रा. पांगारकर यांच्याशी जवळून संबंध आला. त्यांच्यामुळे संतवाङ्मया विषयीचे मादयांचे आकर्षण अधिक दृढ झाले असावे. एका ठाणावळीत त्यांची व मादयांची दररोज नियमाने भेट होत असे. या भेटीत संतकाव्याविषयीची साहजिकच त्यांची चर्चा होई. पांगारकरांचा संत साहित्याचा व्यासंग सखोल होता. या साहित्यावर ते रसाळ व्याख्याने देत असत. या सानिध्याचाही मादयांच्या अभिरुचीवर काही परिणाम निश्चितपणे झाला असला पाहिजे. पण येथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल पांगारकरांच्या बुध्दीत भाविकतेचा किंबहुना भाबडेपणाचा भाग पुष्कळ होता. तर्ककठोर चिकित्सेच्या कसावर त्यांनी संताचे वाङ्मय घासून पाहिले नव्हते. ते संतसाहित्याचे भक्त होते. पण माटे मात्र संताच्या साहित्याचे चिकित्सक अभ्यासक आहेत. टीकाकार आहेत. -

त्यातील सामर्थ्याचे ते प्रशंसक आहेत. या वाङ्मयाची सामाजिक पार्श्वभूमी त्यांनी योग्य त-हेने जाणून घेतलेली आहे. समर्थ रामदासावरील माट्यांची लेखमाला त्यांच्या स्वतंत्र चिंतनावर प्रकाश टाकते. "संत-पंत-तंत" या पुस्तकात त्यांचे संत साहित्यविषयक लेख एकत्रित केले आहेत. त्यात "महार संतांच्या मनाचे सामाजिक दुखणे" हा लेख म्हणजे माट्यांच्या व्यापक सामाजिक अभ्यासाचा एक भाग आहे. ल.रा.पांगारकरांच्यामध्ये या प्रकारची चोखंदळ समाजजाणीव नव्हती पण तरीही त्यांच्या सहवासाचा लाभ माट्यांना सुरुवातीच्या काळात झालेला आहे.

संतसाहित्याबरोबर बॉस्वेलने लिहिलेले डॉ.जॉन्सनचे चरित्र, मॅकॉलेचे निबंध, बर्कची व्याख्याने, काही इतिहासविषयक पुस्तके असेही त्यांचे वाचन वाढत गेले. मिल्टनसारखा कवी त्यांच्या वाचनात आला. इंग्रजी साहित्याचे सामर्थ्य हळूहळू त्यांच्या मनात भरत गेले आणि त्यामुळेच त्यांनी बी.ए. ला अभ्यासासाठी इंग्रजी विषय घेतला.

शाळा कॉलेजात केलेले हे अध्ययन माट्यांना अनेक अर्थांनी उपकारक झाले. निबंधकार म्हणून ते पुढे प्रसिध्दीस आले, तेंव्हा त्यांच्या निबंधलेखनात इंग्रजी साहित्याच्या व्यासंगाच्या खुणा जागोजागी जाणवतात. खरेतर जन्मत:च कुणी लेखक नसतो, लेखकाचे मन घडत गेले पाहिजे ते घडविण्याचे काम स्वत: लेखकानेही जाणीवपूर्वक केले पाहिजे. माटे यांनी हे काम सावधानपणे केले म्हणूनच ते पुढे ग्रंथकार होऊ शकले. "अस्पृष्ठांचा प्रश्न", "विज्ञानबोधाची प्रस्तावना" यासारखे ग्रंथ पुढे त्यांच्याकडून लिहिले गेले. त्याची पूर्वतयारी त्यांनी शाळा कॉलेजात असताना जे वाचन केले त्यामुळे होऊ शकली. माटे हे आपल्या प्रयत्नाने बनलेले एक विचारवंत लेखक आहेत. आपण लेखक व्हावे असे विद्यार्थी अवस्थेतच माट्यांना वाटले असावे.

प्रतिकूल परिस्थितीशी झगडणारी माणसे विचारांनी लवकर प्रौढ होतात. विपन्नावस्थेतच माणसाच्या मनाला झुंजण्याचे अधिक बळ येते. दारिद्र्य हे कित्येक विद्वानांना आणि लेखक कवींना वरदानासारखे ठरल्याची उदाहरणे आहेत. याचा अर्थ पांडित्याच्या प्रभावाला किंवा प्रतिभेच्या निर्मितीला दारिद्र्य आवश्यक असते असा करावयाचा नाही. पण आपत्ती आणि दारिद्र्य माणसाला ज्या प्रकारचे अनुभव ज्ञान मिळवून देते तसे केवळ पुस्तकांतून मिळत नाही. माटे पुस्तकांतून शिकले हे जितके खरे तितकेच किंबहुना त्यापेक्षा अधिक ते जीवनाच्या अनुभवातून आणि चिंतनातून शिकले.

शिक्षक व प्राध्यापकांचे संस्कार :

कै. ल.रा.पांगारकर यांच्या सानिध्याचा माट्यांवर जसा काही परिणाम झाला त्याप्रमाणेच परिणाम करणाऱ्या आणखी काही व्यक्तींचा उल्लेख केला पाहिजे. न्या.रानडे यांचा निर्देश माट्यांनी आत्मचरित्रात आवर्जून केला आहे. त्यांच्या विषयी माटे म्हणतात,

"पुढे समाजसेवेच्या बाबतीत मी जेव्हा काही थोडेफार करू लागलो, तेव्हाही मला वाटे की, न्यायमूर्ति रानड्यांच्या हाताखाली काम करण्याचा योग आपल्याला आला असता, तर बरे झाले असते. पण तो कसा येणार होता ? मी इंग्रजी शाळेत प्रविष्ठ झालो, त्याच वर्षी न्या.रानडे वारले."[7] याबद्दल माटे खंत व्यक्त करतात.

माटे पाचव्या इयत्तेत असताना द्रवीड या शिक्षकाच्या इंग्रजी भाषेच्या अध्यापनाचा त्यांच्यावर झालेला परिणाम त्यांनी आत्मकथनात नोंदला आहे.

12714
A

द्रवीडांचा प्रत्येक शब्द आणि वाक्य माट्यांच्या मते, "तासलीव, कोरीव, कातीव, योजलेल्या आकाराचे, ठसठशीत, आणि जेथल्या तेथे अचूक बसेल, असे असावयाचे. द्रवीडांनी फारच मोठा शब्दसंग्रह हस्तगत केलेला होता. एका एका शब्दाला जेवढे म्हणून पर्याय इंग्रजी भाषेत असतील, तेवढे सगळे त्यांना माहीत असत; आणि त्या शब्दाच्या बारीक बारीक अर्थछटा त्यांनी काळजीपूर्वक पाहिलेल्या होत्या. त्यांना भाषेचा जिवंत लोभ होता. समान अर्थाच्या दहा-दहा, बारा-बारा शब्दसंहति ते मोठया लीलेने सांगत असत."[८] द्रवीडांच्या अध्यापन पध्दतीचे हे वर्णन वाचताना असे वाटते की, माट्यांच्या ठायी असलेल्या विद्यार्थ्यास आणि शिक्षकाला फुलवण्यात द्रवीड यांचा वाटा निःसंशय असला पाहिजे.

आणखी एका शिक्षकाचा - गोपाळ विष्णू तुळपुळे यांचा उल्लेख माट्यांनी केला आहे. श्री.तुळपुळे आणि माटे गुरुशिष्य असले तरी पुढे त्यांच्यातले नाते शुध्द मैत्रीचे असे उत्पन्न झाले. अच्युतराव कोल्हटकरांचा उल्लेख याच प्रकरणांत मागे येऊन गेला आहे त्याची पुनरुक्ती येथे करीत नाही.

कॉलेज जीवनाच्या संदर्भात रँग्लर परांजपे, वासुदेवराव पटवर्धन, गोविंद चिमणाजी भाटे इ. व्यक्तिविषयी माट्यांनी दिलेली माहिती जितकी रंजक तितकीच उद्बोधक आहेत. आपापल्या विषयात व्यासंगी असलेले गुरू लाभणे आणि त्यांच्या छायेखाली आपल्या मनाची जोपासना करणे हा एक सुदैवाचा भाग असतो. माट्यांच्या मनाची आणि व्यक्तित्वाची घडण पुणे शहराने त्यावेळच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीने काही प्रमाणात केली हे खरे पण माट्यांना सुजाण, विचक्षण, रसिक, अभ्यासू, आणि

चिंतनशील बनविण्यात त्यांच्या शिक्षकांचा प्राध्यापकांचा व फर्ग्युसन महाविद्यालयाचा लक्षणीय वाटा होता. स्वत: माटे गरीबस्थितीतून आयुष्याची वाटचाल करीत होते, अशा वेळी त्यांच्या अवतीभोवती विद्याव्यासंगाचे वातावरण असल्यामुळे आपण विद्यासंपन्न होण्याशिवाय गत्यंतर नाही असे अंतर्यामी त्यांना तीव्रतेने वाटले असावे यातूनच माटे घडत गेले. कॉलेजातल्या प्राध्यापकांविषयी त्यांनी आपुलकीने व आवडीने लिहिले आहे. रँग्लर परांजपे यांच्या स्वभावाचे, शिकविण्याच्या लकबीचे वैशिष्टयपूर्ण चित्रदर्शी वर्णन माटे करतात. जणू आपल्या वर्णनाने ते परांजपे, अच्युतराव कोल्हटकर, वासुदेवराव पटवर्धन यांच्या मूर्ती आपल्यासमोर साकार करतात. माट्यांच्या वर्णनात्मकतेला येथे बहार येण्याचे कारण त्यांचे प्राध्यापक हे त्यांच्या अभिमानाचे व आवडीचे विषय आहेत. नमुन्यासाठी काही विधाने सादर करण्यास हरकत नाही.

## रँग्लर परांजपे :

"परांजपे यांचा आवाज मोठा खणखणीत आणि चांगला दूरगामी असे. परंतु एखाद्या वेळी, नाटकांतल्या पात्राला जसे "बाजूस" बोलावयाचे असते [स्वगत], तसे जर परांजपे यांना प्रस्तुत विषयाला सोडून कांही बाजूचे बोलावयाचे असले, तर घसा दाबून कांही विशेष प्रकारचा घरघरीत आवाज ते काढीत आणि शब्दोच्चार तोटका करीत. विषय शिकवतांना कधीही विनोदाचा प्रसंग संभवत नसल्यामुळे हा बाजूचा विषय बोलतांना परांजपे किंचित हसल्यासारखे करीत; आणि त्यांचे हंसणे तोंडापेक्षा डोळ्यांनी जास्त व्यक्त होत असे. त्यांच्या आवाजाची दुसरी एक मौज होती. प्रत्येक वाक्याचा शेवट जवळ आला की, त्यांचा आवाज निमुळता होत जाई; व शेवटी

धनुष्याच्या टोकासारखे बळकट पण बारीक अग्र त्याला प्राप्त होई. कांही वेळा गर्दन फुगवून शिकवावे आणि कांही वेळेला मान थोडीशी लांब करून शिकवावे, अशी आणखी एक सवय परांजपे यांना होती. त्याचप्रमाणे भुवयांची नाचानाच परांजपे हे विलक्षण करीत. "भृकुटिभंग" हा शब्द कवींनी दुसरीकडे खर्ची टाकला आहे खरे; पण केवळ शब्दार्थाप्रमाणेच पाहता परांजपे यांच्या भुवयांच्या या नाचाला तो यथार्थपणे लागू पडण्यासारखा होता."[९] पुढे माटे म्हणतात, "मी रँग्लर परांजपे यांचे वर्णन केले खरे, पण माझा गणित हा विषय इतका कच्चा होता की, या सुप्रसिध्द गणित पंडिताचे सारे पांडित्य माझ्यापुढे अक्षरश: वाया गेले."[१०] या विधानात विनोद आणि खेद यांचे मिश्रण झाले आहे.

समारोप करताना आपले प्राध्यापक आणि प्राचार्य यांच्यासंबंधी माट्यांनी काढलेले उद्गार त्यांच्यावर झालेल्या संस्काराचे द्योतक आहेत. एक उत्तम शिक्षक आणि प्राध्यापक म्हणून माटे यांनी जो लौकिक मिळविला आणि ध्येयनिष्ठेने त्यागपूर्वक जे कार्य केले त्याच्या मागे त्यांच्या गुरूंची प्रकट व अप्रकट अशी प्रेरणाशक्ती होती. यात शंका नाही. आपल्या गुरुजनांविषयी कृतज्ञ राहणारा शिष्य हा देखील एक नामवंत शिक्षक म्हणून घडत जाईल. यात आश्चर्य नाही. माटे यांचा उल्लेख सा-या महाराष्ट्राने "माटे मास्तर" असाच केला आहे. आणि या उपाधीबद्दल त्यांना अभिमानही वाटत होता. आपल्या गुरूंच्याबद्दल सहाव्या प्रकरणात [चित्र सहावे] शेवटी त्यांनी म्हटले आहे की,

"एरवी त्यांची थोरवी वर्णन करावी तेवढी थोडीच होती. रँग्लर परांजपे हे केंब्रिजहून आपल्या कीर्तीची ध्वजा लावून आलेले होते, राजवाडे हे सरकारी नोकरीतून खाजगी संस्थेत आलेले होते, भाटे हे

नाणावलेले इंग्रजीचे स्कॉलर होते. अशी थोर थोर मंडळी केवळ पंचाहत्तर रुपयांवर आमच्या या कॉलेजात कामे करीत असत. हारोखार त्यांचा स्वार्थत्याग पाहिला म्हणजे चित्त भरून येते. त्यांनी जर हा स्वार्थत्याग केला नसता, तर आमच्यासारखो मध्यम किंवा कनिष्ठ स्थितीतील सहस्त्रावधि पदवीधर केवळ मॅट्रिक्युलेट झाल्याबरोबर कोठेतरी इकडे तिकडे भाकरीच्या शोधात राहिले असते. डेक्कन कॉलेजात जाणे, हे फक्त श्रीमंतांनाच शक्य होते. फर्ग्युसन कॉलेज हे गरीबांचे कॉलेज होते; आणि सरकारी नोकरीत शिरून मोठे पगार होणे ज्या विद्वान प्राध्यापकांना सहज शक्य होते, ते महिना पंचाहत्तर टिकल्या घोऊन म्हणजे स्वत: गरीब राहून हे कॉलेज चालवीत होते. महाराष्ट्रात जिकडे तिकडे पदवीधरांचे जे पीक आले, ते त्यांच्या स्वार्थ-त्यागाच्या हातामुळे आले, यांत अजिबात शंका नाही."[११]

नाटकप्रेमी माटे :

विद्यार्थी अवस्थेत असताना माट्यांच्या मनात नाट्यप्रेमाची बीजे रुजली. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी बसविलेल्या नाटकांतून त्यांनी कांही वैशिष्टयपूर्ण भूमिका सादर केल्या होत्या. आचार्य अत्र्यांनीही "क-हेचे पाणी" या आपल्या आत्मचरित्रात माट्यांनी कॉलेजच्या नाटकात काम केल्याचा निर्देश केला आहे. अत्रे आणि माटे या दोघांनीही एका नाटकात भूमिका वठवल्या अशा आशयाचा तो उल्लेख आहे. अत्रे पुढे नाटककार झाले. नाट्यक्षेत्रातली त्यांची कामगिरी अविस्मरणीय आहे. पण माट्यांनीही एक नाटक लिहून ते नाट्याचार्य खाडिलकरांना वाचण्यासाठी दिले होते व त्या नाटकाची शिफारस गंधर्व नाटक मंडळीकडे करावी अशी त्यांनी खाडिलकरांना विनंती केली होती. त्या नाटकाचे शीर्षक "केवळ स्वराज्यासाठी हाच

प्रेमसंन्यास" असे लांबलचक होते. स्वत: माट्यांनीच आपले नाटक कच्चे होते असे म्हटले आहे. "पश्चिमेचा वारा" ही त्यांची कादंबरी ज्याप्रमाणे निबंधावजा झाली आहे तसेच ते नाटक सुध्दा असावे असा तर्क करता येतो. नाटककार होण्याची महत्वाकांक्षा त्या काळात प्रत्येक लेखकाच्या मनात खोळत असायची. गडकरी,खाडिलकर यांच्या कीर्तीची झळाळी पाहून प्रत्येकालाच नाटककार होण्याची दुर्दम्य इच्छा होणे त्या काळात स्वाभाविकच होते. एक अभ्यासक या नात्याने माझ्या मनात असे येते की, माटे नाटककार झाले नाहीत, ते निबंधकार, कथाकार, प्रबंधकार, उत्तम व्याख्याते, श्रेष्ठ प्राध्यापक आणि समाजसुधारक झाले हेच बरे झाले. नाटकाच्या रंगभूमीने त्यांना स्वीकारले असते तर या वर उल्लेखिलेल्या विविध प्रकारच्या भूमिका आपल्या आयुष्याच्या रंगभूमीवर ते सातत्याने करू शकले नसते. पण अखेर कुठेतरी माट्यांच्या मनात आपण नाटककार होऊ शकलो नाही ही खंत राहून गेली असली पाहिजे. आत्मचरित्रात काहीशा विनोदाने त्यांनी याबाबतीत लिहिलेले असले तरी राहून गेलेल्या गोष्टीचा खेद माणसाच्या मनात रेंगाळत असतो, आत्मकथनातून तो प्रकट व्हावा हे स्वाभाविक आहे, पण नाटक या वाङ्मय प्रकाराबद्दल माटे यांना असलेले आकर्षण कधीच कमी झाले नसावे कारण त्यांच्या निबंध-लेखनातही मराठी व इंग्जी नाट्यकृतींचे आणि नाटककारांचे अनेक वेळा उल्लेख येऊन जातात. हा साहित्यप्रकार सर्वांनाच मोह पाडणारा आहे. "काव्येषु नाटकं रम्यं" याचा अर्थच साहित्यात नाटक सर्वाधिक सुंदर असते. असे सर्वमान्य मत आहे. पण माट्यांनी पुढे नाट्यलेखन केले नाही तरी "माणुसकीचा गहिवर", आणि "उपेक्षितांचे अंतरंग" या त्यांच्या गाजलेल्या कथा संग्रहातल्या गोष्टीत जीवनातले नाट्य भरपूर भरलेले आहे. कोणताही साहित्यप्रकार मुलत: जीवननाट्यावरच आधारलेला असतो.

माटे त्याकाळी नाटकमय झाले होते. याचे कारण त्यांनी दिले आहे ते म्हणतात,

"महाराष्ट्राचे तेंव्हाचे सारे वातावरण नाटकानेच दुमदुमून गेले होते. जिकडे तिकडे नाटकांची धूम चाललेली होती आणि राजकारण शून्यवत झालेले होते. ह्याचा परिणाम तरुण लोकांच्या मनावर कांही अंशी विपरीत झाला. तरुणपण हे चांगलेही असते आणि वाईटही असते. संस्कारक्षमतेचा त्याचा गुण चांगल्या कामी कोणी उपयोजीला तर तरुण माणसाचे कल्याण होते पण तो भलत्या क्षेत्रात वापरण्यात आला तर तरुणलोकांचे नुकसान होते."[१२]

खाडिलकर, कोल्हटकर केळकर हे नाटककार त्याकाळात लिहित असत त्यांच्या प्रभावाखाली माटे यांच्यासारखा संवेदनाक्षम तरुण यावा हे स्वाभाविक वाटते.

शिक्षक माटे :

विद्यार्थी अवस्था संपल्यावर माटे शिक्षक झाले. आपण शिक्षक झालो हेच संयुक्तिक आहे असे त्यांना वाटत होते. सरकारी नोकरी करायची नाही असा त्यांचा निर्धार होता. कॉलेजात विद्यार्थी असतानाच हे त्यांनी ठरवून टाकलेले होते. त्यांनी म्हटले आहे, "१९०५ [एकोणिसशे पाच] सालापासून आम्ही काही व्रते मनाने घेतलेली होती. कॉलेजात आल्यानंतर टिळकांच्या शिकवणीने ती कायम होऊन गेली. स्वदेशी कपडा वापरावयाचा, स्वदेशीच साखर खायची आणि सरकारी नोकरी करायची नाही. ह्या आमच्या प्रतिज्ञाच बनल्या. ह्यांच्या जोडीला पुण्यातून हालायचे नाही. असा आणखी एक नियम मी करून टाकला पुण्यात राहिल्याने विद्येच्या

आगरात राहिल्यासारखो होते. राष्ट्रीय चळवळही प्रत्यक्ष पहावयास सापडते."[१३]

या अवतरणावरुन माट्यांच्या दृढ मनोवृत्तीवर प्रकाश पडतो. सरकारी नोकरीचा तिटकारा आणि राष्ट्रीय स्वातंत्र्याचे प्रेम हे त्यांच्या स्वभावाचे विशेष होते. पुण्यातच राहून खाजगी नोकरी करायची हा विचार त्यांच्या विद्याप्रेमातून उद्भवलेला आहे. विद्याव्यासंगाची ओढ असलेल्या विद्यार्थ्यांना पुण्यातले शैक्षणिक वातावरण सर्वस्वी अनुकूल होते. मोठमोठया शिक्षणसंस्था असलेल्या या महाराष्ट्राच्या शैक्षणिक राजधानीत नामांकित शिक्षक, संशोधक, लेखक, कवी, विचारवंत आपले कार्य करीत होते. त्यामुळे पुण्यात राहूनच आपला बौध्दिक विकास होत राहील हा विश्वास माट्यांना वाटला. याचवेळी आपण काही सामाजिक कार्य करावे अशीही ऊर्मि त्यांच्या मनात उचंबळून आली.

लेखनाच्या क्षेत्रात :

एक चांगला शिक्षक म्हणून लौकिक मिळवीत असताना माट्यांच्या ठायी असलेला लेखक हळूहळू प्रकट होत होता. सुरुवातीचे लेखन परीक्षणवजा होते. "केरळकोकिळ" मासिकाचे संपादक कोणी कृष्णाजी गोविंद ओकनरे हे करीत होते. त्यांनी गोविंदराव भाटे यांच्या समाजविचार व्याख्यानांच्या पुस्तकांवर एक परीक्षण लिहिले पण स्वत: माटे यांनाही आपली कृती पसंत पडली नाही. कारण देताना त्यांनी म्हटले आहे की, आपण नुकतेच एम.ए. झालेले होतो, समाजशास्त्राची कसलीही माहिती नव्हती आणि तरीही पुस्तक परीक्षण लिहिले. याचवेळी श्री.व्य.केतकर यांच्या "वसंतकाळ" या नावाच्या काव्यावर

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

माट्यांनी टीकालेख लिहिला त्या काव्यावर आपण अगदी तुटून पडलो होतो अशी आठवण त्यांनी सांगितली आहे. रे.ना.वा.टिळक यांच्याही एका कवितेवर त्यांनी कठोर टीका केली होती त्या संदर्भात माटे म्हणतात,

"जा तूं पड तिकडे सर्नई" असे अवहेलनेचे उद्गार काढून "मला माझो रणशिंग फुंकलें" असा काही एक प्रेषितपणाचा अभिनिवेश टिळकांनी दाखविला आहे, असे मला त्यांचे काव्य वाचून वाटले. इतकेच काय केशवसुतांच्या "तुतारी" ची सुध्दां आतां फारशी मातब्बरी नाही, माझो रणशिंगच मला फुंकले पाहिजे, असा गूढ ध्वनि टिळकांनी ह्या कवितेत काढला आहे."[१४] हे विधान टिळकांना फार लागले असावे. त्याबद्दल त्यांनी आपले प्रतिकूल मत कळवले. आणि पुढे काही दिवसांनी टिळकांनी आपल्या मतात दुरुस्ती केली. हा प्रसंग देऊन माटे म्हणतात, "पण हे कसेही असले तरी पदवीधर बनल्याबरोबर माणसाला अभिप्राय देण्याची संधी दयावी ही पध्दती संपादकांनी मोडूनच काढली पाहिजे."[१५] यावरून तरुण वयातही माटे आत्मपरीक्षण **करीत** होते याची जाणीव होते. या पध्दतीने माट्यांच्या लेखणीला गती मिळत होती. मनात उद्भावलेल्या विचारांना वाट करून देण्यासाठी काहीतरी लेखन करणे आवश्यक आहे असेच ख-या लेखकाला वाटत असते कारण त्याचे निरीक्षण, अध्ययन, चिंतन आणि अनुभव प्रतिदिनी विकसित होत असतात. माट्यांना त्या काळात अनेक लेखक कवींचा थोडाफार सहवासही मिळाला. त्यांच्यासमोर साहित्य प्रांतातले मोठे आदर्श उभे होते. आपणही त्यांच्या मागे जावे आणि एक दिवस स्वत:ची वेगळी वाट शोधावी असे त्यांना वाटलेले असणार कारण याच इच्छेतून व प्रयत्नातून लेखक घडत असतो. माटे नावाचा एक लेखक आणि तत्वचिंतक आणि समाजचिंतक याप्रमाणे आकाराला येत होता.

वक्तृत्वाची घडण :

आपल्या वक्तृत्वाचीही कहाणी त्यांनी प्रकरण १३ वे [चित्र तेरावे] यामध्ये सांगितली आहे. पुण्याच्या "वसंत व्याख्यानमाले" त अनेक वक्त्यांना वक्तृत्वाचा सूर सापडला. माटे"वसंत व्याख्यानमाले" शी अनेक वर्षे संबंधीतहोते. श्रोता, वक्ता, उपवक्ता, अध्यक्ष, चिटणीस व सल्लागार अशा अनेक नात्यांनी या व्याख्यान मालेशी त्यांचा संबंध आला. या काळात त्यांनी अनेक नामांकित वक्त्यांची भाषणे ऐकली. पुण्यात होणारी अभ्यासू वक्त्यांची व्याख्याने त्यांना मार्गदर्शक ठरली. वक्तृत्वाच्या अनेक त-हा त्यांनी पाहिल्या. पुण्याच्या "वसंत व्याख्यान-माले" त भाषण होणे हे त्याकाळी प्रतिष्ठेचे मानले जात असे. आजचेही वक्ते काही प्रमाणात तसे मानतात याचे कारण ह्या व्याख्यान-मालेची परंपरा मोठी आहे. माट्यांनी काही चांगल्या वक्त्यांच्या वक्तृत्वासंबंधी आत्मकथनात लिहिले आहे. ज्यांचे वक्तृत्व त्यांना प्रभावी वाटले त्यांची नामावली दिली आहे. श्रीकृष्ण नीलकंठ चापेकर, शंकरराव राजवाडे, दादासाहेब खापर्डे, तात्यासाहेब केळकर इ. चा उल्लेख त्यांनी विशेषत्वाने केला आहे. त्यात आणखी कित्येक नावांचा निर्देश करताना न्या. रानडे, चिंतामणराव वैद्य, लोकमान्य टिळक, शिवरामपंत परांजपे या सर्व प्रसिध्द व्याख्यात्यांचाही त्यांनी उल्लेख केला आहे. या सर्वांची कित्येकव्याख्याने माट्यांनी आपल्या जडणघडणीच्या काळात ऐकलेली आहेत. विचारप्रवर्तक असे प्रभावी शब्द ज्यांच्या कानावर नेहमीच पडतात अशा व्यक्तींची केवळ व्याख्यान-विषयक अभिरुची जोपासली जाते असे नव्हे तर त्यांच्याही वक्तृत्व-शक्तीला अशा श्रवण भक्तीतून उत्तम खाद्य मिळते. माट्यांचे वक्तृत्व

याच कारणाने फुलत गेले. ते स्वत: उत्तम वाचक,अभ्यासक होते. शिक्षक व प्राध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले. या सर्व गोष्टींचा परिपाक म्हणून त्यांच्या व्याख्यानशक्तीला दृढता मिळाली. महाराष्ट्रातल्या चांगल्या वक्त्यांच्या मालिकेत जी नांवे घेतली जातात त्यात मागील पिढीत आचार्य अत्रे, रा.ना. ची.पडके आणि प्रा.श्री.म.माटे.ही नांवे महत्वाची आहेत.

काळ, परिस्थिती, सामाजिक आणि वाङ्मयीन वातावरण, राजकीय चळवळी या सर्व घटकांतून माट्यांचे विशिष्ट व्यक्तिमत्व घडत गेले असे त्यांच्या "चित्रपट किंवा मला दिसलेले जग" या आत्मकथनातून स्पष्ट होते. ज्या जगात माणूस राहतो त्या जगाचे नानाविध तपशील व बारकावे त्याने पाहिले आणि आपल्या मनात टिपून ठेवले तर त्याची दृष्टी चतु:रस्त्र, चोखंदळ होते. ज्या जगात आपण वाढतो आणि काही काळ राहतो त्याची वैशिष्टये आत्मियतेने समजून घेण्याची प्रवृत्ती असली तर त्यातून माट्यांसारखे व्यक्तित्व घडू शकते.' ही गोष्ट त्यांच्या आत्मकथनातून जाणवते. माट्यांचा विचार करताना केवळ त्यांच्या एकट्याचा व एकट्यापुरता विचार होऊ नये असेच त्यांना सुचवायचे आहे. म्हणूनच आपल्याला दिसलेल्या जगाच्या विस्तृत व अनेक रंगी पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या जीवनाचा चित्रपट रंगवला आहे. माट्यांच्या मनाची आणि व्यक्तित्वाची जडणघडण अशा रीतीने झाली.

00 *÷*÷*÷*÷* 00

## ** संदर्भ सूची **


१] माटे श्री.म. : "चित्रपट, मी व मला दिसलेले जग" व्हीनस प्रकाशन, पुणे-२. पृष्ठ-२१.

२] तत्रैव, पृष्ठ-२२.

३] तत्रैव, पृष्ठ-२३.

४] तत्रैव, पृष्ठ-२६

५] तत्रैव, पृष्ठ-५५

६] तत्रैव, पृष्ठ-५५

७] तत्रैव, पृष्ठ-४४

८] तत्रैव, पृष्ठ-४५

९] तत्रैव, पृष्ठ-६२,६३.

१०] तत्रैव, पृष्ठ-६४

११] तत्रैव, पृष्ठ-७५

१२] तत्रैव, पृष्ठ-१५२

१३] तत्रैव, पृष्ठ-१६१

१४] तत्रैव, पृष्ठ-१७१

१५] तत्रैव, पृष्ठ-१७१


00 *÷*÷*÷* 00